## DISTRICT AND SESSIONS COURT, NAGPUR.

**विषय** : जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे कागदी कातरनचे दरपत्रक प्रसिद्ध करण्याबाबत.

**Endt.No.B-16(2)/3827 /2024** **Date : 28. August, 2024.**

**Submitted for information to** :

District System Administrator Computer Section, District Court, Nagpur.

(He is directed to publish above notice of District Court, Wardha on the **website** of District Court, Nagpur).

I/c Registrar
District Court, Nagpur.

Received on 28/08/24
I/W. No. 2275

जा.क्र. 3183 /रो.व.वि.वि./२०२४
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.
दिनांक :२७/०८/२०२४

प्रति,

मा. प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, यवतमाळ, अमरावती, नागपुर

विषय : जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे कागदी कातरनचे दरपत्रक प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ : स्थानिक खरेदी समिती दि. २१/०८/२०२४ रोजीचे मंजुरी आदेश

आ. महोदय,

उपरोक्त संदर्भांकिंत विषयास अनुसरुन सविनय कळविण्यात येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा या कार्यालयामार्फत नक्कल व अभिलेख विभागातील रद्दी/ कागदी कातरन विकावयाचे असुन त्याबाबतचे दरपत्रक आपल्या जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे ही विनंती.

करीता सविनय सादर.

आपला विश्वासू,

प्रबंधक 28/8/24
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा.

सहपत्र :दरपत्रक

Shri. ... to attend
Dy. Registrar
28/8/24

# जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा

## -: दरपत्रक सुचना :-

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा या कार्यालयातील कागदी कातरन (वेस्ट पेपरची रद्दी) विकावयाची आहे. करीता ज्या लोकांना कागदी कातरन (रद्दी) विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक १३/०९/२०२४ चे सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत सादर करावी.

कागदी कातरन (रद्दी) विकत घ्यावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) जमा असलेली कागदी कातरन (रद्दी) अंदाजे १६० पोते/बारदाणे आहे. व पोते/बादराणेमधील कागदी कातरन (रद्दी) आहे त्या स्थितीत स्विकारावी लागेल त्यानंतर कागदी कातरन (रद्दी) बाबत कोणतेही म्हणणे ग्राहय धरले जाणार नाही.

२) खरेदीदार यांनी जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांचेकडील रद्दी बारदान्यासह घेतल्यास प्रति बारदाना/पोते रू. २०/— शुल्क अतिरिक्त आकारण्यात येईल.

३) दरपत्रक सादर करणाऱ्या खरेदीदारांस अनाम रक्कम रू.१०,०००/— (अक्षरी दहा हजार रूपये केवळ) कार्यालयामध्ये जमा करावी लागेल.

४) खरेदीदारांस कागदी कातरन (रद्दी) मोजुन घेण्याकरीता वजन काटा व रद्दी भरण्याकरीता पोत्याची व्यवस्था तसेच रद्दी घेवून जाण्याची व्यवस्था करावी लागेल.

५) खरेदीदारांस संपुर्ण मालाची/रद्दीची किंमत एकमुस्त दयावी लागेल.

६) दरपत्रक मंजुर झाल्याचे दिनांकापासुन ०३ दिवसांचे आंत किंवा निर्धारीत करून देण्यात आलेल्या मुदतीमध्ये रद्दी न्यावी लागेल. तसेच न केल्यास नविन दरपत्रक बोलाविण्यात येईल.

७) खरेदीदाराने रद्दी निर्धारीत कालावधीमध्ये उचलुन न नेल्यास अमानत रक्कम सरकारला जमा (फॉरफिटेड) करण्यात येईल.

८) प्राप्त दरपत्रक मंजुर/नामंजुर करण्याचा/खरेदी प्रक्रिया स्थगित करण्याचा/रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, वर्धा यांना राहील.

स्वा./-
जिल्हा न्यायाधीश-२
व अति. सत्र न्यायाधीश, वर्धा.

पृष्ठांकण क्र. ३८८३/रो.व.वि.वि./कागदी कातरन/२०२४.
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.
दिनांक :२७/०८/२०२४.

प्रतीलीपी: माहीती व योग्य कार्यवाहीस अग्रेषित
१) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.

Kole

२) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३) जिल्हा परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४) तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५) सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६) नगर परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
७) जिल्हा संगणक प्रणाली, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्दिकरीता.

प्रबंधक 20/1/24
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा